16

दिनांक :- ३०/०४/२०२२

# -: प्रेसनोट :-

आरोपी लाकसेवक श्री.संजय लक्ष्मण चामले, शाखा अभियंता, नगर रचना विभाग, म.न.पा.औरंगाबाद यांनी तक्रारदार यांचेकडे तक्रारदार यांनी करारनामा करुन विकसीत करण्यासाठी घेतलेल्या तीन जमीनीच्या फाईलचे लेआऊट मंजुर करुन देण्यासाठी टेन्टेटीव लेआऊटचे एक लाख व फायनल लेआऊटचे एक लाख अशी लाचेची मागणी करुन तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तीन लेआऊटच्या फाईलचे प्रत्येकी एक लाख रुपये प्रमाणे तीन लाख रुपये लाच स्वतः स्विकारली म्हणुन गुन्हा.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | औरंगाबाद |
| गुन्हा नोंद क्र. | पो.स्टे.सातारा, औरंगाबाद गु.र.नं.१४५/२०२२ कलम ७ भ्र.प्र.अधि.- १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक ३०/०४/२०२२ रोजी ०१.३४ वा. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | श्री.संजय लक्ष्मण चामले, वय-५१, पद-शाखा अभियंता, नगर रचना विभाग, म.न.पा.औरंगाबाद.(वर्ग-२) रा.प्लॉट नं.३८, महाव्दार, सेना नगर, बीड बायपास, औरंगाबाद |
| लाचेची रक्कम | ३,००,०००/- |
| गुन्हा घडता तारीख वेळ ठिकाण | दिनांक २९/०४/२०२२ रोजी २०.११ ते २०.२४ वा दरम्यान. |
| तपास अधिकारी | श्री.रुपचंद मधुकर वाघमारे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.औरंगाबाद. |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार यांनी दिनांक २८/०४/२०२२ रोजी समक्ष येवुन दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाणे आलोसे श्री.संजय चामले, शाखा अभियंता, नगर नचना विभाग, म.न.पा औरंगाबाद हे तक्रारदार यांनी विकसीत करण्याकरीता कररानामा करुन घेतलेल्या जमीनीच्या तीन फाईलचे लेआऊट मंजुर करण्या करीता प्रती फाईल टेन्टेटीव लेआऊट चे एक लाख व फायनल लेआऊटचे एक लाख असे तक्रारदार यांनी सादर केलेल्या तीन फाईलचे तीन लाख रुपये पंचा समक्ष लाचेची मागणी करुन दिनांक २९/०४/२०२२ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांचे सेना नगर, बीड बायपास येथील राहते घरी स्वतः स्विकारली. म्हणुन पो.स्टे.सातारा येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदर यशस्वी सापळा कारवाई पोलीस अधिक्षक मा.डॉ.श्री.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.विशाल खांबे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक, श्री.रुपचंद वाघमारे, यांनी केले सदर सापळा कारवाई मध्ये पोलीस निरीक्षक श्रीमती अनिता इटुबोने, पो.नाॅ.श्री.भिमराज जिवडे, पोअं.राजेंद्र सिनकर, पोअं.विलास चव्हाण व पोअं.श्री.चांगदेव बागुल यांनी कामकाज केले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही महिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.

ई-मेल :- 1) sp1acbaurangabad@gmail.com 2) dyspacbabad@gmail.com

संपर्क क्र. :- ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्र.१०६४, पोलीस अधीक्षक :- ८८८८८०७२९९

अपर पोलीस अधिक्षक :- ८७८८६४४९९४.

(रुपचंद म.वाघमारे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद